RCS No. 36/2020

**अंतिम हुकूमनामा अर्ज क्र.३६/२०२०**

**जुना अ.हु.अर्ज क्र.१/२०१८**

**निशाणी १९ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार तर्फे दाखल करणेत आला असून अर्जदार यांनी असे कथन केले की, मुळ अर्जातील जाबदार भानुदास गोपाळ कुलकर्णी हे दिनांक ०७.०५.२०२२ रोजी लेंगरे येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे वयस्कर असून पुणे येथे राहणेस आहेत. अर्जदार अजारी असलेने त्यांचे उपचार सुरु आहेत. तसेच जाबदार यांचा मृत्युदाखला प्राप्त न झालेने वेळेत जाबदार यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून अर्ज मंजूर करणेत यावा अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

२. जाबदार तर्फे अर्जास म्हणणे दाखल न केलयाने प्रस्तुत अर्ज त्यांचे विरुध्द विनाम्हणणे चालविणेत आला.

३. अर्जदार यांचा निशाणी १९ वरील अर्ज व अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी जाबदार यांचा मृत्युदाखला दाखल केला आहे. मुळ अर्ज अर्जदार यांनी रे.दि.मु.नं.६२/२०१५ च्या प्राथमिक हुकूमनाम्यावरुन अंतिम हुकूमनामा होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. दरम्यान जाबदार भानुदास कुलकर्णी हे दिनांक ०७.०५.२०२२ रोजी मयत झाले. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दिनांक १८.११.२०२२ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज विलंबाने दाखल केला आहे. परंतू फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज द्रव्यदंडावर मंजूर करणे न्यायोचित ठरते.

**RCS No. 36/2020**

सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

निशाणी १९ कडील अर्ज र.रु.१००/– तालुका विधी सेवा समिती, विटा (खानापूर) यांना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.04.08 11:34:01 +0530

विटा. **[श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)]**
दिनांकः– ०५.०४.२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.